# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

**दिनांक: 31/०३/२०२४** **वार – रविवार**

---

**मतदार जन जागृती**

लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबवण्यात येत आहेत. इंदापूरच्या शासकीय निवास शाळेतील विद्यार्थ्यांनी तृतीयपंथी घटकांच्या सहभागातून मतदान जनजागृतीपर फेरीचं आयोजन केलं होतं. तर शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाच्यावतीने, राजा रविवर्मा कलादालनात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या मतदार जनजागृतीपर भित्तीपत्रक प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**ईस्टरसंडे**

प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानचा दिवस ईस्टर संडे आज सर्वत्र साजरा होत आहे. ख्रिश्चनधर्मीयांच्या चाळीस दिवसांच्या उपवासाची सांगताही आज होत आहे. ईस्टर संडेनिमित्त पुण्यातील विविध चर्चमध्ये आज विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आली. काही चर्चमध्ये रक्तदान, नेत्र तपासणीसह आरोग्य शिबिर भरवण्यात आलं. ईस्टरनिमित्त गरिबांना अन्नदान आणि अन्य दान-धर्म केला जात असल्याची माहिती पुणे धर्म प्रांताचे बिशप अँड्र्यू राठोड यांनी दिली.

**बाबाआढाव**

फुले, शाहू, आंबेडकर, लहुजी वस्ताद साळवे, अण्णा भाऊ साठे यांनी दिलेला समतेचा विचार आज हरवत चालला आहे; तो विचार टिकवणं ही काळाची गरज असल्याचं मत जेष्ठ कामगार नेते डॉक्टर बाबा आढाव यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. दलित चळवळीचे आणि मातंग समाजाचे अभ्यासक भाऊसाहेब सोनवणे यांच्या नव्वदीनिमित्त आयोजित कृतज्ञता गौरव सोहळ्यात ते बोलत होते. भाऊसाहेब सोनवणे यांनी मातंग समाजासाठी अत्यंत मोलाचं योगदान दिलं आहे, अशा शब्दात त्यांनी सोनवणे यांच्या कार्याचा गौरव केला.

**रुग्णालय**

पुण्यातील लोहगाव परिसरात १०० खाटांचं नवं उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आलं असून पुढच्या आठवड्यापासून ते कार्यरत होण्याची शक्यता असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागानं दिली आहे. या रुग्णालयात रुग्णांसाठी सर्वसाधारण कक्ष, अतिदक्षता विभाग, प्रयोगशाळा आणि रुग्णालयाशी संबंधित अन्य सुविधांचा समावेश आहे.

**एसटी**

एसटीच्या पुणे विभागातील पाच बस आगार पूर्णपणे इलेक्ट्रिक केले जाणार आहेत. यात स्वारगेट, इंदापूर, मंचर, आळंदी आणि सांगवी आगरांचा समावेश आहे. स्वारगेट डेपोमधून 137, सांगवीतून 30, इंदापूरमधून 29, मंचरमधून 27 तर आळंदीमधून 28 अशा एकंदर 251 ई-गाड्या धावणार आहेत.

**बेंद्रे स्वेच्छानिवृत्त**

आकाशवाणी पुणे केंद्राचे सुविख्यात उद्घोषक सिद्धार्थ बेन्द्रे ३० वर्षांच्या सेवेनंतर आज स्वेच्छानिवृत्त होत आहेत. उद्घोषक म्हणून प्रथम त्यांची आकाशवाणी मुंबई केंद्रावर नियुक्ती झाली होती. एकंदर ३४ वर्षे उद्घोषक म्हणून त्यांनी कार्य केलं. फोन इन कार्यक्रम, सुप्रभात, महक, लोभ असावा असे अनेक कार्यक्रम त्यानी सादर केले. पंढरपूरची वारी, मॅराथॉनचं प्रत्यक्ष वर्णन अनेक वर्षे त्यांनी केलं. मान्यवरांच्या मुलाखती, महत्वाचे बाह्य प्रसारण कार्यक्रम, स्पष्ट आणि उत्स्फूर्त सादरीकरणामुळे ते श्रोतृवर्गात विशेष लोकप्रिय होते. निवेदक तुमच्या भेटीला- या कार्यक्रम मालिकेचं पहिलं पुष्प त्यांनीच गुंफलं, जे विशेष लोकप्रिय ठरलं होतं. चित्रपट संगीत हा

त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक संकल्पनांवर आधारित चित्रपट गाणी, मधुमालती, गाता रहे मेरा दिल, बेला के फूलमध्ये विशेष गाजली. लता दीदींच्या निधनाचं वृत्त विविध भारतीवरून सकाळी १० वाजता प्रसारित झाल्यावर तासाभरातच त्यांनी स्टुडिओमधून लता दीदींवर एक विशेष कार्यक्रम प्रसारित केला. जवळचे स्नेही आणि अधिकारी त्यांना एनसायक्लोपीडिया या नावानं हाक मारतात. आकाशवाणी पुणे केंद्राच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेंद्रे यांच्या निवृत्तीनिमित्त नुकतंच एका भावपूर्ण निरोप समारंभाचं आयोजन केलं होतं.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. वाढत्या उन्हाळ्यामुळे बटाटा, मटार आणि घेवड्याच्या भावात वाढ झाली आहे. तर तोतापुरी कैरी, काकडी, गाजर आणि फ्लॉवरच्या भावात घट झाली. पालेभाज्यांचे दर टिकून आहेत. उन्हाळी रसाळ फळांची आवक वाढली आहे. फुल बाजारात मात्र गेल्या पंधरा दिवसांपासून मंदीचं वातावरण आहे.

**क्रीडा**

पुण्यात सुरू असलेल्या १४व्या लायन्स् प्रिमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेत नायर ईगल्स संघाने कोकणे स्टार्सचा ६ गडी राखून पराभव करत उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात साची सुपर किंग्ज संघाने जाधव नाईट रायडर्सचा २ गडी राखून पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३९ तर किमान २२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**